विभाग क्र. १०.४
दर रु. ३०,६००/- + २०% कारपेट रु.३६,७२०/- प्रति चौ.मी.
शासकिय मुल्यांकन रुपये **नोंदणी फी रु.**
करारनामा किंमत र.रुपये **स्टॅम्प रु.**

॥ ओम साई ॥

फ्लॅट विक्री करारनामा

फ्लॅट विक्री करारनामा आज दिनांक माहे इसवी सन **२०१७ रोज** ते दिवशी नाशिकरोड मुक्कामी :-

श्री. उ.व. , धंदा- रा. PAN-	लिहून घेणार

.. यांसी ..

श्री. प्रभुदास लक्ष्मण पटेल उ.व. ५५, धंदा- शेती व व्यापार, राहणार : दत्त मंदिर रोड, नाशिकरोड, ता.जि.नाशिक - ४२२ १०१ PAN- ABXPP9270B	लिहून देणार

कारणे **फ्लॅट विक्री करारनामा** लिहून व नोंदवुन देतो ते ऐसा जे की :-

१) **मिळकतीचे वर्णन :-**

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका हद्दीतील, मौजे **दसक** ह्या गावचे शिवारातील बिनशेती प्लॉट मिळकत यांसी **सर्व्हे नंबर ५१/२क/१** मधील मंजुर ले-आऊट मधील प्लॅन पैकी प्लॉट नंबर **४/२+५+६** यांसी एकुण क्षेत्र **१०३६.६१ चौ.मीटर**, यांसी बिनशेती आकार रु. ७७७=४५ पैसे, यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : कॉलनी रोड
पश्चिमेस : स.नं.५१/१ब
दक्षिणेस : स.नं.५१/२क
उत्तरेस : प्लॉट नंबर ४/१

येणेप्रमाणे चतु:सिमेतील वर्णनाची प्लॉट मिळकत. यांत जल, तरु, तृण, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेपासह, जाणे-येणेचे, कॉलनी रोड वापराचे, वागवहिवाटीचे तसेच इजमेंट राईटस्‌चे हक्क व अधिकारासह तदंगभूत वस्तूसह दरोबस्त.

☛ उपरोक्त करारनाम्यामध्ये लिहून घेणार यांचा उल्लेख **'तुम्ही'** व लिहून देणार यांचा उल्लेख **'आम्ही'** असा केलेला आहे. तसेच या कराराने तुम्हांस विक्री केलेल्या / बुकींग केलेल्या फ्लॅट मिळकतीचा उल्लेख **'सदर मिळकत'** असा करण्यात आलेला आहे.

२) **मिळकतीचा पुर्वइतिहास** :-

वर कलम १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतींपैकी प्लॉट नंबर ४/२ व प्लॉट नंबर ५ ह्या मिळकती आम्ही लिहून देणार यांनी प्रमिला मधुकर गांगुर्डे व इतर-१५ तर्फे जनरल मुखत्यार निर्मल डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. रमेश टी माखीजा यांचेकडून व निर्मल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. रमेश टी माखीजा यांचे संमतीने खरेदी घेतलेल्या असून सदर खरेदीखतांचा दस्त मा. दुय्यम निबंधक, नाशिक-२ यांचे कार्यालयात अनुक्रमे दस्त क्र. ३३६४/२००० व ३३६५/२००० दि. ११/०४/२००० रोजी लिहून व नोंदवुन घेतलेले आहे. तसेच प्लॉट नंबर ६ ही मिळकत लिहून देणार यांना श्री. नितेश करमशी सिंघानी (पटेल) यांनी बक्षीस दिलेली असून सदर बक्षीस पत्राचा दस्त मा. दुय्यम निबंधक, नाशिक-२ यांचे कार्यालयात दस्त क्र. ३६४२/२०१४ दि. २९/०४/२०१४ रोजी नोंदविण्यात आलेला असून सदरहू मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटस्‌ला मालक सदरी लिहून देणार यांचे नावाची नोंद झालेली असून सदरील प्लॉट मिळकती ह्या आमचे कबजात, वहिवाटीत व उपभोगात अशा आहेत. सदरचे मंजुर बिल्डींग प्लॅन प्रमाणे आम्ही सदर प्लॉट मिळकतीवर **"दुर्गा अपार्टमेंट"** ह्या नावाच्या इमारतीचे बांधकाम सुरु केलेले आहे. तसेच सदरील इमारती मधील बांधीव भाग विक्री करण्याचा आम्हांस कायदेशीर हक्क व अधिकार आहे. त्या हक्क व अधिकारानुसार सदर इमारतीमधील बांधीव फ्लॅट मिळकत आम्ही तुम्हांस करारनाम्यान्वये विक्री केलेली आहे.

त्यामुळे आपले उभयतांमध्ये कराराच्या अटी व शर्ती ठरविण्यात आलेल्या आहेत व त्या लिखित स्वरुपाच्या असाव्यात म्हणून सदरचा फ्लॅट विक्री करारनामा आम्ही तुमचे लाभात आजरोजी लिहून व नोंदवून देत आहोत.

३) **बिनशेती परवानगी व अंतिम ले-आऊट** :-

वर कलम १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती मा. अपर तहसिलदार,नाशिक यांनी त्यांचेकडील हुकूम नंबर **बिनशेती/एसआर/३०/२००५ दिनांक १५/०२/२००५** अन्वये निवासी कारणासाठी बिनशेतीकडे वर्ग केलेल्या आहे. तसेच सदर प्लॉट मिळकती ह्या अंतिम मंजुर ले-आऊट मधील असून सदर ले-आऊट प्लॅन मे. सहाय्यक संचालक, नगररचना, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडील मंजुरीचा क्रमांक **जा.नं./लॅन्ड/अंतिम/ले-आऊट/२/१३० दिनांक २४/०४/१९९२** अन्वये मंजुर केलेला आहे.

४) **बांधकाम परवानगी** :-

वर कलम १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर बांधण्यात आलेल्या इमारतीचा बिल्डींग प्लॅन नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी मंजूर केलेला असून त्यांचेकडील मंजुरीचे पत्र क्रमांक **एलएनडी/बीपी/सी-४/६०९४/१९१ दिनांक २७/०१/२०१७** असे आहे.

५) **फ्लॅट मिळकतीचे वर्णन** :-

वर कलम १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर बांधत असलेल्या इमारतीस **" दुर्गा अपार्टमेंट"** असे नांव देण्यात आलेले आहे. सदरची इमारत ही **चंद्रेश्वर नगर, दुर्गा माता मंदीराजवळ, जेलरोड, नाशिकरोड, ता.जि. नाशिक** येथे बांधण्यात येत आहे. ह्या इमारती मधील रहिवाशी फ्लॅटस् पैकी मजल्यावरील **फ्लॅट नंबर ( )** यांसी **क्षेत्र चौ.फुट म्हणजेच चौ.मीटर कारपेट + कपाट व बाल्कनी क्षेत्र चौ.फुट म्हणजेच चौ.मीटर यांसी एकुण क्षेत्र चौ.मीटर** ही रहिवाशी बांधीव फ्लॅट मिळकत. बेड + हॉल + किचन + बाल्कनी, ॲटेच संडास बाथरुमसह, तसेच सोबत **परिशिष्ट अ** मध्ये वर्णन केलेल्या सुखसुविधांसह बांधीव फ्लॅट मिळकत यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस :
पश्चिमेस :
दक्षिणेस :
उत्तरेस :

येणेप्रमाणे चतु:सिमेतील फ्लॅट मिळकतीमध्ये जाण्या-येण्याचे, वागवहिवाटीचे हक्कांसह तसेच कॉलनी रस्त्यांचा व इमारतीमध्ये सामाईकपणे वापर करण्याचे हक्कांसह व स्वतंत्र इलेक्ट्रीक मिटर व कनेक्शनसह दरोबस्त मिळकत.

६) सदरील इमारतीमध्ये एकुण १२ रहिवाशी फ्लॅटस् बांधावयाचे असून सदर इमारत बांधणेकामी सिव्हील इंजिनिअर, आर्किटेक्ट, कॉन्ट्रॅक्टर व मजुर यांची नेमणुक आम्ही केलेली आहे. तुम्ही आमचे मालकी हक्क हे स्वच्छ आहे व विक्रीय आहेत याची दर्शविलेल्या कागदपत्रांवरुन खात्री केलेली आहे.

७) वर कलम १ यात नमुद केलेल्या मिळकतीवर बांधत असलेल्या प्रस्तुत इमारतीत तळाला संपूर्ण पार्कींगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच सदरहू इमारतीमध्ये लिफ्ट ची देखील व्यवस्था करण्यात आलेली आहे. लिहून देणार यांनी त्यांचे इंजिनिअर्स, आर्किटेक्ट व कॉन्ट्रॅक्टर यांची नेमणुक करुन बांधकाम सुरु केलेले आहे. प्रस्तुत इमारतीस आम्ही **दुर्गा अपार्टमेंट** असे नाव दिलेले आहे.

८) **फ्लॅट मिळकतीची किंमत** :-

वर कलम ५ यात वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीची तुमचे व आमचे दरम्यान उक्ती किंमत **रक्कम रुपये** **/- (अक्षरी रक्कम** **मात्र)** इतकी ठरलेली असून सदरची किंमत आजचे चालु व प्रचलित बाजारभावाने योग्य, वाजवी व बरोबर आहे. सदरचे एकुण किंमतीचा भरणा पुढील प्रमाणे.

रक्कम रुपये **तपशिल**

/- **अक्षरी रक्कम** **मात्र**

=======

असा वरील प्रमाणे भरणा तुमचेकडून आम्हाला मिळाला तो पावला, भरण्याबाबत आमची तक्रार नाही. उर्वरित रक्कम रु. **/- (अक्षरी रक्कम रुपये मात्र)** ही तुम्ही आम्हाला कामाच्या प्रगतीनुसार टक्केवारीने **परिशिष्ट-ब** मध्ये नमुद केल्याप्रमाणे द्यावयाची आहे, ही ह्या कराराची महत्वाची अट व शर्त आहे व ती तुम्हांस मान्य व कबुल आहे.

अशी वरीलप्रमाणे रक्कम तुम्ही आम्हाला ठरल्याप्रमाणे द्यावयाची आहे, ही ह्या कराराची महत्वाची अट व शर्त आहे व ती तुम्हांस मान्य व कबुल आहे. सदरची रक्कम मुदतीत अदा न केल्यास सदरचा करारनामा रद्द करण्याचा हक्क व अधिकार आम्हाला आहे व राहील. तसेच करारनामा नोंदणीकामी झालेल्या खर्चाशी आमचा काही एक संबंध राहणार नाही.

९) लिहून देणार यांनी ठरलेल्या मुदतीत बांधकाम पुर्ण न केल्यास व मुदतीत सदर फ्लॅट मिळकतीचा ताबा न दिल्यास, लिहून घेणार यांना सदरचा करारनामा रद्द करावयाचा नसल्यास, लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना रेरा कायद्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे व्याज द्यावयाचे आहे. तसेच लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना ठरलेल्या मुदतीत उर्वरित रक्कम न दिल्यास त्यावर लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना रेरा कायद्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे व्याज द्यावयाचे आहे.

१०) तुम्हांस जो फ्लॅट द्यावयाचा आहे, त्याचा कबजा सदर फ्लॅट मिळकतीची उर्वरित राहीलेली रक्कम मिळाल्यावर व संपूर्ण रक्कमेचा भरणा पुर्ण झाल्यानंतर व म.न.पा.कडून कम्प्लीशन सर्टिफीकेट मिळाल्यावर खरेदीखत नोंदणी दिवशी देण्यात येईल, ही ह्या कराराची महत्वाची अट व शर्त आहे व ती तुम्हांस मान्य व कबुल आहे.

११) तुमचे लाभात जो फ्लॅट ट्रान्सफर करावयाचा आहे, त्या फ्लॅट मिळकतीचा करारनामा व खरेदीखत नोंदणी करावे लागेल, त्याकामी येणारा संपूर्ण खर्च म्हणजेच स्टॅम्प डयुटी, नोंदणी फी, टायपिंग, झेरॉक्स व वकील फी इ. अन्य स्वरुपाचा खर्च हा तुमचे तुम्ही करणेचा आहे.

१२) नाशिक महानगरपालिका हद्दीतील चेक्स स्वीकारले जाईल, परंतु नाशिक महानगरपालिका हद्दी बाहेरील चेक्स स्वीकारले जाणार नाहीत.

१३) यदाकदाचित तुम्ही फ्लॅटचे बुकींग रद्द केल्यास सदरच्या फ्लॅटचे किंमतीचे १०% (दहा टक्के) रक्कम वजा करुन राहिलेली रक्कम तुम्हांस सदर फ्लॅट दुसऱ्या व्यक्तीस विक्री केल्यानंतर परत केली जाईल हे तुम्हांस मान्य व कबुल आहे. तसेच नोंदणी केलेल्या कराराचे खर्चाशी आमचा काहीएक संबंध राहणार नाही. तसेच सदर फ्लॅट मिळकतीचे बुकींग तुम्ही रद्द केल्यास सदर फ्लॅट मिळकतीचे कॅन्सलेशन डिड तुम्ही आमचे लाभात लिहून व नोंदवून द्यावयाचे आहे, त्याकामी लागणारा संपूर्ण खर्च तुमचे तुम्हीच करणेचा आहे, त्या खर्चाशी आमचा संबंध राहणार नाही.

१४) तुम्हांस जो फ्लॅट द्यावयाचा आहे, त्याचे बांधकाम व त्यामधील सुखसोयी या करारात **परिशिष्ट अ** मध्ये नमुद केलेल्या आहेत, त्या तुम्हांस मान्य व कबुल आहेत.

१५) सदरील बिल्डींग मध्ये तुम्हांस सदर फ्लॅटचा ताबा दिला जाईल. बिल्डींग मधील टेरेस किंवा मोकळ्या जागेचा ताबा दिला जाणार नाही, तो सर्व सभासदांना सामाईक वापर करण्याकरिता राहील.

१६) तुम्हांस कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज मिळविण्यासाठी आवश्यक ते कागदपत्र आम्ही मिळवून देऊ. परंतु सदरचे कर्ज मंजुर करण्याची व परतफेड करण्याची जबाबदारी तुमचेवर आहे व राहील. तसेच सदरचे कामी होणारा संपुर्ण खर्च हा तुमचे तुम्ही करावयाचा व सोसावयाचा आहे.

१७) इलेक्ट्रीक मिटरचे संदर्भात आम्ही कारवाई करु. तसेच इलेक्ट्रीक मिटरचे संदर्भात होणारा संपुर्ण खर्च तुम्ही आम्हाला वेगळा द्यावयाचा आहे. सदरची रक्कम फ्लॅटचे किंमतीमध्ये धरण्यात आलेली नाही. तसेच महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लि. चे व नाशिक महानगरपालिकेचे वेळोवेळी होणारे बदल हे तुमचेवर बंधनकारक आहे व राहतील. तसेच ॲडव्हान्स मेन्टेनन्स रक्कम रुपये ७५,०००/- हे तुम्ही आम्हांस वेगळी द्यावयाची आहे.

१८) तुम्ही वर नमुद केल्याप्रमाणे आम्हाला रक्कम अदा करणार असून वेळेवर रक्कम देण्याची अट ही महत्वाची अट आहे. जर तुम्ही मुदतीत रक्कम अदा केली नाही तर आम्ही सदरील करारनामा रद्द करुन दुसऱ्या सभासदास सदरील फ्लॅट मिळकत ट्रान्सफर करु, तो सर्वस्वी अधिकार फक्त आम्हाला आहे.

१९) सदरील फ्लॅट मिळकतीमध्ये करारनाम्यात दर्शविलेल्या सोयी व्यतिरिक्त जादा काम केल्यास तुम्हांस त्या कामाचे वेगळे पैसे भरावे लागतील.

२०) सदर इमारतीमधील तुम्हाला तुमचे फ्लॅट मिळकतीचे व्यतिरिक्त इतर सामाईक मिळकतीमध्ये जाण्यायेण्याचे व वागवहिवाटीचे हक्कांसहीत इतर कोणतेही हक्क सांगता येणार नाही. तसेच सदरील फ्लॅट मिळकत तुम्हांस तुमचे रहिवासी कारणाकरिता विक्री केलेली आहे.

२१) वर कलम १ यात वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही संपुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची अशी असून ती कोणतेही जडजोखमांत गुंतविलेली नाही. सदरील प्लॉट मिळकत पुर्णपणे बोजारहित आहे.

२२) सदर फ्लॅट मिळकतीपोटी जी.एस.टी. ची होणारी रक्कम तुम्ही आम्हांस फ्लॅट मिळकतीचे किंमतीव्यतिरिक्त वेगळी द्यावयाची आहे. तसेच सदर फ्लॅट मिळकतीचे खरेदीखत तुमचे लाभात लिहून व नोंदवुन दिल्यानंतर महाराष्ट्र अथवा केंद्र शासनाचे अपार्टमेंटचे कायद्यात काही बदल झाले किंवा काही टॅक्स लागु केल्यास तो खर्च तुम्हांस वेगळा करावा लागेल.

२३) सदर फ्लॅट मिळकतीचे कारपेट क्षेत्र .... चौ.मीटर आहे. आणि कारपेट क्षेत्र म्हणजेच फ्लॅटचे मजल्याचे प्रत्यक्षात वापराजोगे क्षेत्र.

२४) तुम्हांस तुमचे फ्लॅट मिळकतीचा कब्जा दिल्या तारखेपासुन सरकारी, निमसरकारी कर, टॅक्सेस, घरपट्टी, लाईट बिल, मेन्टेनन्स चार्जेस व इतर खर्च हा तुम्ही करावयाचा व सोसावयाचा आहे, त्याचेशी आमचा काहीएक संबंध राहणार नाही.

२५) तुम्हांस विक्री केलेली फ्लॅट मिळकत तुमचे ताब्यात दिल्यानंतर तुम्ही इमारतीचे मुळ बांधकामास कोणताही धोका पोहोचेल असे बांधकाम/दुरुस्ती करावयाची नाही, केल्यास त्यामुळे होणाऱ्या संपुर्ण खर्चाची व परिणामांची जबाबदारी तुमचीच राहील.

२६) सदर मिळकतीचे बांधकाम करत असतांना नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास अथवा बांधकामाकरीता आवश्यक असणारे स्टिल, रेती, सिमेंट इत्यादी वस्तुंचा तुंटवडा झाल्यास म्हणजेच लिहून देणार यांचे आवाक्याबाहेरील काही गोष्टी

झाल्यास त्याप्रमाणे सदर करारनाम्याची मुदत आपसात समजुतीप्रमाणे वाढवुन देण्यात येईल.

२७) वर कलम १ यात वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही दसक, ता.जि.नाशिक या परिसरात येत असल्याने नाशिकचे जे वातावरण आहे ते तीनही ऋतुला पोषक असे आहे. म्हणजेच हिवाळयात वातावरण खुप थंड होणे, उन्हाळ्यात कडाक्याचे ऊन पडणे, अथवा पावसाळयात पर्जन्यवृष्टी गारवा अथवा अति उकडणे या सर्व वातावरणाचा परिणाम नविन बांधकामावर होत असतो. त्यामुळे इमारतीस व फ्लॅटमध्ये आतील नीरु प्लास्टरला बारीक तडे, हेअर क्रॅक्स जाण्याचा संभव असतो याची स्पष्ट कल्पना देखील आम्ही तुम्हांस दिलेली आहे.

२८) सदर मिळकतीचा प्रोजेक्ट हा लिहून देणार यांनी Real Estate (Regulation And Redevelopment) Act, 2016 चे तरतुदीनुसार Real Estate Regulatory Authority यांचेकडे अर्ज क्र. .... दि. .... अन्वये नोंदविलेला आहे.

२९) सदर करारनामाविषयी लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये काही वाद उद्भवल्यास सदरचा वाद उभयपक्षांनी आपसात लवादाची नेमणुक करुन मिटवायचा आहे. लवादाने दिलेला निर्णय उभयतांवर बंधनकारक राहील. तसेच लवादाने दिलेला निर्णय मान्य नसल्यास सदरचा वाद Real Estate (Regulation And Redevelopment) Act, 2016 नुसार संबंधीत अधिकाऱ्याकडे तक्रार करावयाची आहे.

३०) सदरचा करारनामा हा Real Estate (Regulation And Redevelopment) Act, 2016 च्या तरतुदीस व महाराष्ट्र ओनरशिप ॲक्ट (रेग्युलेशन ॲण्ड प्रमोशन ऑफ कन्स्ट्रक्शन, सेल, मॅनेजमेंट ॲण्ड ट्रान्सफर) कायदा १९७३ च्या तरतुदीस अधिन राहुन केला आहे. तसेच डिक्लरेशन ऑफ अपार्टमेंटमध्ये नमुद केलेले नियम व नियमावली लिहून घेणार यांना मान्य व कबुल असून त्यांचेवर बंधनकारक राहतील.

परिशिष्ट - अ

१. **आर.सी.सी.** :- आर.सी.सी. स्ट्रक्चर मध्ये इमारतीचे बांधकाम असेल.

२. **भिंती** :- आतील भिंती ४ इंच रुंद बांधकामात व बाहेरील भिंती ६ इंची रुंद बांधकामात असतील.

३. **प्लॅस्टर** :- बाहेरील बाजुने डबल कोट सॅण्डफेस सिमेंट प्लॅस्टर असेल व आतील बाजुने एक कोट सॅण्डफेस सिमेंट प्लॅस्टर व एक कोट जिप्सम फिनिशिंग प्लॅस्टर असेल.

४. **कलर** :- बाहेरील भिंतींना ॲक्रेलिक व आतील भिंतींना एशियन पेंटस् ट्रॅक्टर इमलशन देण्यात येईल.

५. **टाईलिग** :- सर्व रुम मध्ये ३२"X३२" व्हेट्रीफाईड टाईल्स असेल. तसेच बाथरुममध्ये सिलींग हाईटपर्यंत फुल ग्लेझ्ड टाईल्स बसविण्यात येईल.

६. **दरवाजे** :- मेनडोअर चौकट बॉक्स प्लाय, बाथरुम चौकट व बेडरुमच्या चौकटी ग्रेनाईट मध्ये असतील.सर्व दरवाजे फ्लश डोअर दोन्ही बाजुने सनमायका मध्ये असतील.

७. **खिडक्या** :- सर्व खिडक्या स्लायडींग विंडो असतील विथ मॉस्केटो नेट व सेफ्टी ग्रीलसह तसेच खिडक्यांचे फ्रेम ग्रेनाईट मध्ये असतील.

८. **किचन ओटा** :- ग्रेनाईट मध्ये, स्टिलचा सिंकसह असेल व बिम बॉटम लेव्हल पर्यंत ग्लेझ्ड टाईल्स बसविण्यात येतील.

९. **विजेचे काम** :- सर्व रुममध्ये ३.५ लाईट पॉईन्ट व किचन मध्ये व बाथरुममध्ये एक पॉवर पॉईंट व किचनमध्ये एक मिक्सर पॉईंट देण्यात येईल. तसेच हॉलमध्ये एक टी.व्ही. पॉईंट देण्यात येईल. तसेच सर्व फिटींग कन्सील्ड मध्ये असेल.

१०. हॉल व बेडरुममध्ये फॉल सिलींग दोन स्पॉटलाईट फिटींगसह देण्यात येईल.

११. **पाणी पुरवठा** :- इमारतीस कॉमन ओव्हरहेड व अंडरग्राऊंड वॉटर टँक असेल.

१२. बोअरींगसाठी एक वॉटर मोटार देण्यात येईल.

१३. इमारतीसाठी एक महानगरपालिकेकडील ३/४ इंची पाण्याचे कनेक्शन मिटरसह बसविण्यात येईल.

१४. एकुण इमारतीसाठी सामाईक लिफ्टची व्यवस्था केली जाईल.

परिशिष्ट - ब
पेमेंटची टक्केवारी

१.	प्लींथचे काम पुर्ण झाल्यावर	१५%
२.	पहिला स्लॅब पुर्ण झाल्यावर	१०%
३.	दुसरा स्लॅब पुर्ण झाल्यावर	०८%
४.	तिसरा स्लॅब पुर्ण झाल्यावर	०८%
५.	चौथा स्लॅब पुर्ण झाल्यावर	०८%
६.	पाचवा स्लॅब पुर्ण झाल्यावर	०८%
७.	विटकाम पुर्ण झाल्यावर	१०%
८.	प्लास्टरचे काम पुर्ण झाल्यावर	१३%
९.	टाईल्सचे काम पुर्ण झाल्यावर	१०%
१०.	खिडकी,दरवाजे व कलरींगचे काम झाल्यावर	०८%
११.	फ्लॅटचा ताबा देतांना	०२%
	एकुण	**१००%**

====

येणेप्रमाणे सदरचा फ्लॅट विक्री करारनामा हा तुमचे व आमचे दरम्यान वरील अटी व शर्तीना अधिन राहून ठरलेला असून तो उभयतांनी वाचून घेवून, समजून घेवून, राजीखुशीने, दोन साक्षीदारांसमक्ष त्यावर सह्या केल्या आहेत. ता.म.

हा **फ्लॅट विक्री करारनामा.**

____

श्री. प्रभुदास लक्ष्मण पटेल
(लिहून देणार)

____

(लिहून घेणार)

साक्षीदार :

१.. २..